Original.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

**क्र.मजीप्रा-२०१६/सभा-१३६/(१२)/आ.४** **दिनांक : २५.४.२०१६**

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
संचालक, (तां.) तथा प्राधिकरणाचे सदस्य, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.२८ मार्च, २०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३६व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दि.२८ मार्च, २०१६ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३६व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

25/4/16

**(उदय जाधव)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

**प्रत :** खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय), मंत्रालय, मुंबई. सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे ही विनंती.

**प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे / नाशिक/ औरंगाबात / अमरावती / नागपूर.
उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.
उप मुख्य लेखाधिकारी (१ / २ ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. मुंबई / सिडको भवन, नवी मुंबई.

+

सोबतच्या इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधित कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्यती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३६ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३६वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.ना.श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी सकाळी ११.१५ वा. मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना. श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
३) मा.श्री.हेमंत लांडगे, संचालक(तां.) म.जी.प्रा. तथा म.जी.प्रा. सदस्य, मुंबई.
४) मा.श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा.तथा म.जी.प्रा. सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.उदय जाधव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
३) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३५ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची १३५ वी सभा दि.१५फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३५व्या सभेच्या इतिवृत्तास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३५ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दि.१५ फेब्रुवारी, २०१६ रोजी संपन्न झालेल्या १३५व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १३५ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरत्या शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळण्या बाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपग्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गूंतवावी याबाबत शासनाने दि.२७.१०.२०१५ अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार मंहाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

अल्प मुदतीच्या गुंतवणुकीरचा प्रस्ताव सर्वसाधारणपणे १५ दिवस ते १ वर्षापर्यत कमी कालावधीतील वेगवेगळया टप्यांसाठी प्रस्तावित केले जातात या करीता वेगवेगळया राष्ट्रीयकृत बँकाचे/ वित्तीय संस्थेचे व्याजदर मागविले जातात. त्यापैकी ज्या बँकांचे व्याजदर सर्वाधिक असतील अशा बँकेकडे मा.सदस्य सचिव व संचालक (वित्त) यांच्या मान्यतेने गुंतवणुक केली जाते.

तसेच दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीमध्ये (१ वर्षापेक्षा जास्त) घसारा निधी पेन्शन फंड इत्यादी गुंतवणुकीचा समावेश होतो. शासनाच्या दि.२७.१०.२०१६ च्या सुधारीत मार्गदर्शक निर्देशानुसार दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकी राष्ट्रीयकृत बँकेचे/ वित्तीय संस्थेचे व्याजदर मागविले जातात. ज्या बँकानी सर्वाधिक व्याजदर दिले आहेत. अशा बँकेकडे सदस्य सचिवांच्या मान्यतेले गुंतवणुक केली जाते.

प्राधिकरणाच्या १३५व्या बैठकीत दि.७.१०.२०१५ ते दि.२९.१.२०१६ या कालावधीचे अल्प/दीर्घ मुदतीच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि.३०.१.२०१६ ते दि.१६.३.२०१६ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणुकीस मा. संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावावर कर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यांत येतो की, दि.३०.१.२०१६ ते दि.१६.३.२०१६ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यांत येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.४** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१३-१४चा महालेखापालांकडील वार्षिक लेखा परिक्षण अहवाल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ च्या वार्षिक लेख्यास दि.३ जून, २०१५ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या १३३व्या सभेत स्विकृत करण्यात आलेले आहेत. आता महालेखापाल मुंबई कार्यालयाकडून सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे प्रमाणित करण्यांत आलेले आहेत.

प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर महालेखापालांनी प्रमाणित केलेले लेखे व लेखा परिक्षण अहवाल वार्षिक अहवालासोबत विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यात येतात. त्या दृष्टीने मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे, या लेखा परिक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरीता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** म.जी.प्रा. चे सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देणे.

मा. सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा. संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले.

मा.प्रधान सचिव (पापुवस्ववि) यांनी विचारणा केली की, सन २०१६-१७ या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तुटींचा का सादर करण्यात आला. याबाबत मा.सदस्य सचिव यांनी अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उत्पन्नाचे स्त्रोत कमी आहे व अधिकारी / कर्मचारी यांचा वेतन व भत्त्याचा खर्च तसेच पेन्शनचा खर्च हा जास्तीचा होत आहे. त्यामुळे शासनाने रु.१३९.४४ कोटी अनुदान स्वरुपात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन द्यावे.

सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक यांना मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<u>ठराव :</u>

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन-२०१५-१६ चे सुधारित अंदाज व सन-२०१६-१७ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | तपशिल | सन-२०१५-१६ चे सुधारित अंदाज | सन-२०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ६७७२७.८७ | ४६७०१.०३ |
| २ | महसुली खर्च | ६६३०७.५६ | ६०६४५.३१ |
| ३ | भांडवली जमा | १७८२७३.९८ | ७०९८५.३८ |
| ४ | भांडवली खर्च | १७८२७३.९८ | ७०९८५.३८ |

असा ठराव करण्यात येतो की, मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दि.२१/११/२०१२ रोजी झालेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने निर्गमित झालेल्या इतिवृत्तानुसार महाराष्ट्र

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

जीवन प्राधिकरणातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्ती वेतनाचा खर्च शासनाने अंदाजपत्रकीय तरतुदीद्वारे सोसण्यासाठी व ई.टी.पी.चे दर पाटबंधारे व जलसंपदा विभागाप्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्ताव शासनास मजीप्राने दि.२८/१/२०१४ रोजी सादर केला आहे.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील प्रकरण चार कलम २६(२) नुसार कलम २५ किंवा या कलमाचे पोट-कलम (१) यांच्या तरतुदींना बाध न येऊ देता राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने [प्राधिकरणाला] या अधिनियमाखालील आपल्या कर्तव्याचे कार्यक्षमरितीने पालन करण्यासाठी आणि आपली कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर निधीची रचना करता येईल. कलम २७ नुसार (प्राधिकरण) शक्य असेल तेथवर राज्य शासनाकडून अनुदान किंवा अर्थसहाय्याची रक्कम घेतल्यानंतर या अधिनियमाखालील आपली कार्ये, तोटयात चालविणार नाही. तसेच कलम २८ नुसार राज्य शासनास त्याबाबतीत योग्य रीतीने करण्यात येतील अशा विनियोजनाव्दारे राज्य शासन निर्धारित करील अशा अटी व शर्तीवर, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी (प्राधिकरणाला) वेळोवेळी अनुदाने किंवा अर्थसहाय्य देता येईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात रु.१३९.४४ कोटी जी तुट आलेली आहे. ती तुट भरुन काढण्यासाठी शासनाने सन २०१६-१७ च्या व्हाईट बुक (White Book) मध्ये रु.१३९.४४ कोटीची अंदाजपत्रकीय तरतूद करुन म.जी.प्रा.स अनुदान स्वरुपात द्यावे. म्हणजे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते व निवृती वेतन धारकांचे निवृत्ती वेतन अदा करता येईल.

सदर अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम १९७६ मधील कलम ३४ (१) नुसार शासनास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**आयत्या वेळेची चर्चा. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थकीत असलेल्या पाणीपट्टीवरील विलंब आकार तसेच कर्जावरील व्याज माफीच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्भय योजनेबाबत.**

स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थकीत असलेल्या पाणीपट्टीवरील विलंब आकार तसेच कर्जावरील दंडनीय व्याज माफीच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्भय योजनेबाबतची वसूली शाखेकडील कार्यालयीन टिपणी, मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची स्थानिक स्वराज्य संस्थांकडे दिनांक २०.०९.२०१५ अखेर पाणीपट्टी व कर्ज मिळून रु.३,६७८.४१ कोटी एवढी थकबाकी आहे. थकबाकी वसूलीसाठी विविध उपाय योजना करुन देखील स्थानिक स्वराज्य संस्थां ही थकबाकी भरणा करत नाहीत. त्यामुळे या थकबाकीच्या मुळ येणे रकमेवरील विलंब आकार/ दंडनीय व्याज यात दिवसेंदिवस वाढ होत जाते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ग्राहकांकडील (महानगरपालिका/ नगरपालिका/जिल्हा परिषद /ग्रामपंचायत व पाणी पुरवठा केंद्रावरील ग्राहक) थकीत पाणीपट्टीच्या रकमेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा १९७६ च्या उपविधीतील कलम १५च्या तरतूदीप्रमाणे प्रतिमाह १% विलंब आकार लावण्यात येतो. विलंब आकार माफीची तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा/ उपविधीत नमूद केलेली नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थकीत असलेल्या पाणीपट्टीवरील विलंब आकार तसेच कर्जावरील दंडनीय व्याज माफीची निर्भय योजना सन २००४ ते सन २०१५ या वर्षाकरिता टप्प्या-टप्प्याने, शासन मान्यतेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून राबविण्यात आली. या योजनेंतर्गत थकबाकीदार स्थानिक स्वराज्य संस्थां/इतर ग्राहक यांनी पाणीपट्टी/कर्जाची मुळ थकबाकीची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास पुर्णपणे भरणा केल्यास त्यांना योजनेच्या कालावधीत पाणीपट्टीवरील विलंब आकार/कर्जावरील दंडनीय व्याज यात सवलतीचा लाभ अनुज्ञेय होता. तथापी, निर्भय योजनेबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांकडील प्रतिसाद कमी राहिल्याने

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

थकबाकीची रक्कम प्रभावीपणे वसुल झाली नाही. या योजनेची मुदत दिनांक ३१.०७.२०१५ रोजी संपलेली आहे व योजनेस पुन्हा मुदतवाढ मिळणेच्या प्रस्तावास वित्त विभाग, मंत्रालय यांनी मान्यता दिलेली नाही.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्भय योयजनेबाबतचा कार्यालयीन टिपणीच्या अनुषंगाने साधक-बाधक चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, स्थानिक स्वराज्य संस्थां महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची थकबाकी विहित दिनांकास भरणा करीत नसल्याने मुळ पाणीपट्टीवरील व कर्जाच्या थकीत रकमेवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा १९७६ च्या उपविधीतील कलम १५च्या तरतुदीप्रमाणे थकीत पाणीपट्टीवर प्रतिमाह १% विलंब आकार लावण्यात येतो. पाणीपट्टीवरील विलंब आकार माफीची तरतूद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कायदा/उपविधीत नमुद केलेली नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थां/इतर ग्राहकांकडील पाणीपट्टी थकबाकीच्या वसुलीस मर्यादा येतात. परिणामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आर्थीक स्थिती बिकट होते. करिता पाणीपट्टीची वसूली वाढवण्याच्या हेतूने, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा १९७६ च्या उपविधीतील कलम १५ च्या तरतूदीत थकीत पाणीपट्टीच्या येणे रकमेवरील प्रतिमाह १% या दराने लावण्यात आलेला विलंब आकार माफ/अंशत: कमी करणेबाबत उपविधीत आवश्यक सुधारणा करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे व याबाबतचा आवश्यक प्रस्ताव पुढील बैठकीत संचालक (वित्त) यांनी ठेवावा.

याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी मा.सदस्य सचिव हयांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

मा.मंत्री,
पा.पु. व स्व. तथा
अध्यक्ष, म.जी.प्रा.

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.